जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAY 2024
पुण्यनगरी

# नॅनो सायन्सच्या विद्यार्थिनींची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागामधील विद्यार्थिनींनी डिग्रीपूर्वीच ऑन जॉब ट्रेनिंगद्वारे पेंट इंडस्ट्रीमध्ये नोकरी मिळवून यश संपादन केले. प्रतीक्षा शिंदे आणि सुप्रिया चिपरे या दोघी ५ वर्षांचा नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी हा इंटिग्रेटेड प्रोग्रॅमच्या शेवटच्या वर्षात शिकत आहेत. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या प्रोग्रॅमच्या आवश्यकतेनुसार शेवटच्या वर्षी प्रतीक्षा आणि सुप्रिया या दोघी औद्योगिक प्रशिक्षणासाठी नाशिक येथील नामवंत हायटेक ड्युरा या पेंट कंपनीमध्ये इंटर्नशिपसाठी स्टायपेंड घेऊन रुजू झाल्या होत्या. त्यांचे कौशल्य आणि बुद्धिमत्ता पाहून त्यांना पूर्ण वेळ रुजू केले. प्रतीक्षा रिसर्च अँड डेव्हलपमेंट एक्झिक्युटिव्ह म्हणून, तर सुप्रिया क्वालिटी कंट्रोल हेड म्हणून रुजू झाली आहे. नॅनो सायन्स अधिविभागाचे संचालक डॉ. के. के. शर्मा यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

1 9 MAY 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'छ. शिवरायांचे असामान्य जीवन व कर्तृत्व' यावर उद्या डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमालेत व्याख्यान

## 'पानिपत'कार विश्वास पाटील गुंफणार पुष्प

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत सोमवारी (दि. २०) सायंकाळी ५ वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन येथे ज्येष्ठ साहित्यिक, 'पानिपत'कार विश्वास पाटील यांचे 'छत्रपती शिवरायांचे असामान्य जीवन आणि कर्तृत्व' या विषयावर व्याख्यान होणार आहे. शिवराज्याभिषेक दिनाच्या साडेतीनशेव्या वर्षानिमित्त युगपुरुष छत्रपती शिवरायांची शौर्यगाथा, ज्ञात-अज्ञात इतिहास विश्वास पाटील आपल्या खास शैलीत उलगडणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. गेल्या ३७ वर्षांपासून सुरू असलेल्या या व्याख्यानमालेत यावर्षी विश्वास पाटील ३४ वे पुष्प गुंफणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. मराठीतील प्रथितयश लेखक विश्वास पाटील यांनी कथा, कादंबरी, नाटक यांच्या माध्यमातून मराठी भाषेत विपुल साहित्यलेखन केले आहे.

त्यांचा १९८० मध्ये 'आंबी' (कादंबरी), १९८२ मध्ये 'कनाल चौक' कथासंग्रह प्रकाशित झाला. १९८६ ला 'चलो दिल्ली' (अनुवादित संग्रह), तर १९८८ ला ऐतिहासिक कादंबरी 'पानिपत' प्रकाशित झाली. 'चंद्रमुखी', 'पांगिरा' व 'महानायक' कादंबऱ्यांची हिंदीत भाषांतरे झाली आहेत. छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेक दिनाचे यंदाचे साडेतीनशेवे वर्षे आहे. यानिमित्त रयतेचे स्वराज्य निर्माण करणाऱ्या छत्रपती शिवरायांचा प्रेरणादायी इतिहास 'छत्रपती शिवरायांचे असामान्य जीवन आणि कर्तृत्व' या विषयातून ते मांडणार आहेत. या व्याख्यानास वेळेपूर्वी १५ मिनिटे सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAY 2024

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षेस ९० टक्के विद्यार्थी

कोल्हापूर : प्रतिनिधी

या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील विविध अधिविभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा दि. १६ मे पासून सुरू झाली आहे. शनिवारी झालेल्या परीक्षेस एकूण २ हजार ९०८ विद्यार्थ्यांपैकी २ हजार २ हजार ६३० विद्यार्थी उपस्थित होते. तर २७९ विद्यार्थी अनुपस्थित होते. परीक्षेस विद्यार्थी बसण्याचे प्रमाण ९०.४४ टक्के इतके आहे.

ऑफलाईन पद्धतीने कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव या जिल्ह्यामध्ये या परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षा सुरळीत होण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठ समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शनिवारी विविध १६ केंद्रावर एम. एस्सी. केमिस्ट्री, एम. एस्सी. मॅथेमॅटिक्स, एम. एस्सी. मायक्रोबायोलॉजी, एम. एस्सी. झूलॉजी, एम. एस्सी. फिजिक्स या विषयांच्या परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १०.३० ते १२.००, दुपारी १.०० ते २.३० व दुपारी ३.३० ते ५.०० या तीन सत्रात ही परीक्षा आयोजित करण्यात आली होती.

## आजच्या परीक्षा

रविवारी प्रवेश परीक्षेचा अखेरचा दिवस आहे. या दिवशी एम. एस्सी. इनव्हायर्मेंटल सायन्स, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, एम. एस्सी. भूगोल, एम. एस्सी. जिओइन्फॉरमेटीक्स, एम. ए. योगशास्त्र, एम. बी. ए. इन रूलर मॅनेजमेंट, एम. बी. ए. डिस्टंस मोड या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा होणार आहे.

19 MAY 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदव्युतर अभ्यासक्रमांच्या परीक्षेला २६३० विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित पदव्युतर अभ्यासक्रमांच्या परीक्षेला २९०८ विद्यार्थपैकी २६३० विद्यार्थी बसले. २७९ विद्यार्थी अनुपस्थित होते.

विद्यापीठातर्फे २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये, अधिविभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा दि. १६ मे पासून सुरू झाली आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव जिल्ह्यामध्ये विविध परीक्षा केंद्र आहेत. परीक्षेसाठी महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठ समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAY 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा शनिवारी सुरळीतपणे पार पडल्या. २०५९ विद्यार्थ्यांपैकी १७७ विद्यार्थी गैरहजर होते. शनिवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बॅचलर ऑफ ॲग्रीकल्चर, मास्टर ऑफ लॉ, मास्टर ऑफ एज्युकेशन, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. दि.१८ रोजी पीजी डिप्लोमा इन टुरिझम अँड ट्रॅव्हल, एमसीए (इंजिनिअरिंग), एमएस्सी (कॉम्प्युटर सायन्स), एमएस्सी (डाटा सायन्स), एमए (पॉलिटिकल सायन्स), एमए (इकोनॉमिक्स) आदी १७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर सुमारे ४७१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAY 2024
तरुण भारत

# पदव्युत्तर प्रवेश परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाविद्यालय व विद्यापीठातील विविध अधिविभागांना प्रवेश घेण्यासाठी प्रवेश परीक्षा सुरू आहे. शनिवारी एमएस्सी केमेस्ट्री, एम. एस्सी मॅथॅमॅटिक्स, मॅथॅमॅटिक्स, वुईथ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, एमएस्सी मायक्रोबायोलॉजी, फार्मासिटीकल मायक्रोबायोलॉजी, इंडस्ट्रीयल मायक्रोबायोलॉजी, एमएस्सी झुलॉजी, एमएस्सी फिजिक्स या पाच विषयांची प्रवेश परीक्षा झाली. या परीक्षेला २ हजार ९०८ पैकी २ हजार ६३० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर २७९ विद्यार्थी अनुपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 MAY 2024
सकाळ


प्रतीक्षा शिंदे


सुप्रिया चिपरे

# 'नॅनोसायन्स'च्या विद्यार्थिनींची पेंट इंडस्ट्रीमध्ये निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागामधील विद्यार्थिनींनी डिग्री पूर्वीच ऑन जॉब ट्रेनिंगद्वारे पेंट इंडस्ट्रीमध्ये नोकरी मिळविली आहे. प्रतीक्षा शिंदे आणि सुप्रिया चिपरे या दोघींनी हे यश मिळविले आहे. पाच वर्षांचा नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी हा इंटीग्रेटेड प्रोग्रॅमच्या शेवटच्या वर्षात त्या शिकत आहेत. नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी प्रोग्रॅमच्या आवश्यकतेनुसार शेवटच्या वर्षी प्रतीक्षा आणि सुप्रिया या औद्योगिक प्रशिक्षणासाठी नाशिक येथील हाय-टेक ड्युरा पेंट कंपनीमध्ये इंटर्नशिपसाठी स्टायपेंड घेऊन रुजू झाल्या होत्या. बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमाचा त्यांना खूप फायदा झाला आणि त्याचीच फलश्रुती म्हणून कंपनीने त्यांचे कौशल्य आणि बुद्धिमत्ता पाहून त्यांना पूर्ण वेळ रुजू केले आहे. त्यातील प्रतीक्षा रिसर्च अँड डेव्हलोपमेंट एक्सिकेटिव्ह म्हणून, तर सुप्रिया ही क्वालिटी कंट्रोल हेड म्हणून रुजू झाली आहे.